शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय
असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक
भत्त्याच्या दरात सुधारणा........

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक :प्रवास-१०११/प्र.क्र.२२/सेवा-५
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,दिनांक :-२७डिसेंबर,२०११

संदर्भ: १) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक-प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५,
दि.३ मार्च,२०१०.

**प्रस्तावना:-**

शासन निर्णय वित्त विभाग,दि.३ मार्च,२०१० अन्वये सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार प्रवास व दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.सदर शासन निर्णयातील परिच्छेद ९ येथील तक्ता क्र."ब" नुसार अनुसूचित दर आकारणाऱ्या हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यास शासकीय कर्मचाऱ्यास देय असलेल्या दैनिक भत्त्याचे दर विहीत करण्यात आलेले आहेत.तथापि दिल्ली,मुंबई,कोलकाता,चेन्नई,बंगळूरु,हैद्राबाद या शहरांतील हॉटेलमधील वास्तव्याचे प्रत्यक्ष दर हे वरील शासन निर्णयातील परिच्छेद ९(ब),तक्ता (ब) मधील रकाना ४ नुसार निश्चित केलेल्या दरांपेक्षा अधिक असल्याने त्यात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

दिल्ली,मुंबई,कोलकाता,चेन्नई,बंगळूरु,हैद्राबाद या शहरांतील अनुसूचित दर आकारणाऱ्या हॉटेलमधील वास्तव्याच्या दरात झालेली वाढ विचारात घेता, दौऱ्यावर असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या दैनिक भत्त्याच्या दरांत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

अनुसूचित दर आकारणाऱ्या हॉटेलमधील वास्तव्यासाठी दैनिक भत्त्याचे दर -

| अ.क्र. | श्रेणी | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | दिल्ली,मुंबई,कोलकाता, चेन्नई,बंगळूरु,हैद्राबाद | |
|---|---|---|---|---|
| | | | शा.नि.दि.३-३-२०१० नुसार दर. | सुधारित दर |
| १ | प्रथम श्रेणी | अ) रु.८ ९००/-व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी+(HAG+ श्रेणी) | रु.१०००/- | रु.३०००/- |
| | | ब) रु.६ ६००/-व त्याहून अधिक मात्र रु.८ ९००/- पेक्षा कमी | रु.७५०/- | रु.२०००/- |
| २ | द्वितीय श्रेणी | अ) रु.५ ४००/-व त्याहून अधिक मात्र रु.६ ६००/-पेक्षा कमी | रु.७५०/- | रु.२०००/- |
| | | ब) रु.४,४००/-व त्याहून अधिक मात्र रु.५,४००/-पेक्षा कमी | रु.५७५/- | रु.१५००/- |
| ३ | तृतीय श्रेणी | अ) रु.४,२००/- व रु.४,३००/- | रु.३७५/- | रु.९००/- |
| | | ब) रु.४,२००/- पेक्षा कमी | रु.३००/- | रु.८००/- |

तसेच दैनिक भत्ता मंजूर करण्यासंदर्भातील वरील १) यंथील दि.३ मार्च,२०१० च्या शासन निर्णयातील अन्य अटी कायम राहतील.

हे आदेश दिनांक १ डिसेंबर,२०१० पासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११९२२७११३७४२१२४२००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स.अ.मु.नकवी)
उप सचिव,वित्त विभाग

प्रति,

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक,
मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू
रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट ,मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)